# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/Ac. Moni/२०१५/६२

दिनांक ०६/१/२०१५

प्रति,

मा. कुलसचिव,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ,
अमरावती.

**विषय :- व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे शैक्षणिक अन्वेक्षण बाबत.**

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/एलआयसी/२०१४ / १५४६ दिनांक २४ डिसेंबर २०१४.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास सादर करण्यात येते की, आपल्या विद्यापिठामार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे शैक्षणिक अन्वेक्षण (Academic Monitoring) करीता गठीत करण्यात येणा-या स्थानिक चौकशी समिती (एल.आय.सी.) मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाचा एक प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबत तसेच संचालनालयामध्ये झालेल्या बैठकीचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यात येत आहे. (प्रत सलग्न). त्यानुषंगाने कार्यवाही व्हावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**सहपत्रे :-** वरील प्रमाणे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, विद्यापिठाचे सलग्नीकरण व तद्अनुषंगिक विषयावर चर्चा करण्याकरीता तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई येथे दिनांक ५/१२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जोडलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

...अ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांकः२/एनजीसी/एलआयसी/२०१४/ १५४६१.
दिनांक : 24 DEC 2014

प्रति,
मा.कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, मुंबई / सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे /
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर / उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव/
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद /
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर / संत गाडगेबाबा
अमरावती विद्यापीठ, अमरावती / सोलापूर विद्यापीठ, सोलापुर / स्वामी
रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड / गोंडवाना विद्यापीठ, गडचिरांली/
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र
विद्यापीठ, लोणेरे.

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे शैक्षणिक अन्वेक्षण (Academic Monitoring) बाबत...
संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालयात दि.५.१२.२०१४ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठाकडुन व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे शैक्षणिक अन्वेक्षण (Academic Monitoring) करण्यात येते. त्यानंतर संबंधित अभ्यासक्रमांना विद्यापीठाकडुन संलग्नता प्रदान करण्यात येते. तंत्रशिक्षण संचालनालयामार्फतही व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे शैक्षणिक अन्वेक्षण करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, अशाप्रकारे एकाच प्रकारचे काम शासनाच्या दोन वेगवेगळया यंत्रणांमार्फत करणे, उचित होणार नाही.

उपरोक्त परिच्छेदाचे अवलोकन करता आपल्या विद्यापीठामार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे शैक्षणिक अन्वेक्षण (Academic Monitoring) करीता गठीत करण्यात येणा-या स्थानिक चौकशी समिती (एल.आय.सी.) मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाचा एक प्रतिनिधी नियुक्त करण्यात यावा. यासंदर्भात विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणाने घेतलेला निर्णय संचालनालयास कळविण्यात यावा जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे संचालनालयास सोईचे होईल.

~~आपला,~~

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नाशिक / अमरावती / नागपुर यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भात संबंधीत विद्यापीठाकडे पाठपुरावा करण्यात यावा. त्याचप्रमाणे बैठकीत झालेले इतिवृत्तातील संस्थांशी संबंधीत निर्णय आपल्या विभागीय कार्यालयाच्या परिक्षेत्रातील संस्थाप्रमुखांचे निदर्शनास आणुन त्याचे अनुपालन होत आहे याची खातरजमा करावी.

## ☼ बैठकीचे इतिवृत्त ☼

महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यापुर्वी विद्यापीठांचे संलग्नीकरण व तद्अनुषंगिक विषयांवर चर्चा करण्याकरीता सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली संचालनालयातील बैठक दालनात शुक्रवार दिनांक ५.१२.२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. दयानंद मेश्राम | सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| २. | डॉ. राजपाल एस. हांडे | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ मुंबई |
| ३. | डॉ. व्ही.बी. गायकवाड | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |
| ४. | एम.ए. काकडे | परिक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर |
| ५. | डॉ. अजय देशमुख | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, |
| ६. | डॉ. बी. एम. भांजे | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, सोलापुर विद्यापीठ, सोलापुर |
| ७. | प्रा. मधुरा केसरकर | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई. |
| ८. | डॉ. एस. एम. रोकडे | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. |
| ९. | डॉ. एस.पी.यावलकर | उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| १०. | डॉ. आर. व्ही. शेटकर | सहाय्यक संचालक (तांत्रिक), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ११. | श्री. एस.डी. उपरवट | विशेष कार्य अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| १२. | सौ. सुरेखा गोसावी | सहाय्यक संचालक (अतांत्रिक), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |

सदर बैठकीत पुढील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे एकमताने निर्णय घेण्यात आले :-

❖ <u>व्यावसायिक अभ्यासक्रमांचे संलग्नीकरण</u> :-

- राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना संलग्नीकरणसाठी अर्ज करण्याची ३१ ऑक्टोंबर ही अंतिम दिनांक आहे.
- तथापि, संलग्निकरणाकरीता अर्ज सादर केल्यानंतर विद्यापीठांकडुन संलग्निकरण प्रदान करण्याची कोणतीही तारीख ठरविण्यात आलेली नाही. त्यामुळे ब-याच महाविद्यालयांना प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यानंतर संलग्निकरण प्राप्त होते, ज्यामुळे संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रिभुत प्रवेशप्रक्रियेमध्ये अनेक अडचणी/न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवतात. अशाप्रकारच्या अडचणी निर्माण न होण्याकरीता सर्व विद्यापीठांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांना संलग्निकरण देण्याचा अंतिम दिनांक ठरविणे आवश्यक आहे.
- काही विद्यापीठांमध्ये संलग्निकरण अटींच्या अधीन राहुन देण्यात येते, व त्रुटींची पुर्तता केल्यानंतरच अंतिम संलग्निकरण देण्यात येत असल्याचे निदर्शनास आणुन दिले.
- व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या काही महाविद्यालयांकडुन प्रवेशक्षमता कमी करण्यासाठी विद्यापीठांना विनंती केली जाते. तथापि, विद्यापीठ स्तरावर अशा प्रकारे कोणतीही कार्यवाही न करता संबंधित महाविद्यालयास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदकडे याबाबत विहीत पध्दतीने अर्ज करण्याकरीता कळविण्यात यावे.
- राज्यातील सर्व विद्यापीठांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांना ३० एप्रिलपर्यंत संलग्नता प्रदान करावी, **३० एप्रिलनंतर संलग्नता मिळालेल्या अभ्यासक्रमांचा समावेश तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या त्या वर्षाच्या केंद्रीभुत प्रवेशप्रक्रियेमध्ये करण्यात येवू नये**, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

- नवीन संस्था आणि नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता मिळाल्यानंतर संबंधितांनी तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभुत प्रवेशप्रक्रियेमध्ये समाविष्ठ होण्याकरीता विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे पत्र प्रवेशप्रक्रीया सुरु होण्याचे किमान आठ दिवस अगोदर संचालनालयास सादर करावे.

❖ **प्रथम वर्षाचे निकाल वेळेत जाहीर करणे :-**

- व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या थेट व्दितीय वर्ष प्रवेशाकरीता प्रथम वर्षाचा निकाल आणि तंत्रशिक्षण मंडळाचा अंतिम वर्षाच्या निकालाची आवश्यकता असते. त्यापैकी तंत्रशिक्षण मंडळाचे निकाल हे वेळेत जाहीर होतात. तथापि, विद्यापीठांच्या प्रथम वर्षाच्या निकालांबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये एकसुत्रता नसल्याची बाब निदर्शनास आली. सर्वसाधारणपणे विद्यापीठांकडुन प्रथम वर्षाचे निकाल जाहीर झालेल्या तारखांचे विश्लेषण केल्यास हे निकाल मे ते ऑगस्ट पर्यंत जाहीर करण्यात आलेले आहेत, त्यामूळे व्दितीय वर्षाची प्रवेशप्रक्रिया विहीत वेळेत पुर्ण करता येत नाही व परिणामी प्रवेश उशिरा झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान / सत्रातील कमी दिवस इ. अडचणी उद्‌भवतात.
- तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या थेट व्दितीय वर्षाच्या केंद्रीभुत प्रवेशप्रक्रियेकरीता राज्यातील सर्व विद्यापीठांनी त्यांच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमांचे निकाल साधारणतः जुलै २०१५ च्या प्रथम आठवडयाचे कमालमर्यादेत जाहीर करावेत, तसेच सर्व निकालाची सॉफ्ट कॉपी तंत्रशिक्षण संचालनालयास देण्यात यावी. अशाप्रकारचा निर्णय घेण्यात आला.
- राज्यातील विद्यापीठांकडुन सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबतची तपासणी प्रत्येक वर्षी "स्थानिक चौकशी समितीमार्फत" करण्यात येते. स्थानिक चौकशी समितीचा अहवाल व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थांनी त्यांच्या संकेतस्थळी प्रकाशित करणे, संस्थांवर बंधनकारक करण्यात यावे, त्याबाबत विद्यापीठामार्फत सर्व संस्थांना अवगत करण्यात यावे तसेच विद्यापीठांनीसुध्दा त्यांचे संकेतस्थळावर त्याची एक प्रत प्रसारीत करावी.

त्याचप्रमाणे स्थानिक चौकशी समितीचा अहवालाची एक प्रत तंत्रशिक्षण संचालनालयास अग्रेषित करण्यात यावी. ज्या संस्थांच्या संकेतस्थळी विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीचा अहवाल प्रकाशित केला नसेल अशा संस्थांचा संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभुत प्रवेशप्रक्रीयेकरीता विचार केला जाणार नाही, अशी सूचना करण्यात आली. तसेच सदर समितीमध्ये संचालनालयाचा प्रतिनिधी असावा असेही सुचविण्यात आले. त्याबाबत सर्व विद्यापीठांना कळविण्यात यावे असे ठरविण्यात आले.

❖ पदव्युत्तर पदवी प्रवेशपात्रता :-

- पदव्युत्तर पदवी प्रवेशाकरीताची पात्रताविषयक शिफारशी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मानके विचारात घेऊन राज्यातील विद्यापीठांनी संचालनालयास अवगत कराव्यात. तसेच ही माहिती लवकरात लवकर संचालनालयास पाठवावी जेणेकरुन माहिती पत्रकात त्याचा समावेश करणे सोईचे होईल. प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यानंतर नियमात/ पात्रतेत बदल करण्यात येवू नयेत असेही ठरविण्यात आले.

❖ एमसीए थेट व्दितीय वर्ष प्रवेशाबाबत :-

- एमसीए (लॅटरल एन्ट्री / सेपरेट डिव्हीजन) या तीन वर्ष पुर्णवेळ व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश संचालनालयाकडुन करण्यात येतात. तथापि, थेट व्दितीय वर्षात प्रवेश दिल्याने विद्यार्थ्यांना पुरेसे ज्ञान अवगत नसल्याने त्यांच्या भवितव्याकरीता अडचणी येत आहेत. उद्योगजगताकडुनही अशा उमेदवारांना फारशी पसंती देण्यात येत नाही. त्यामुळे एमसीए अभ्यासक्रमाकरीता थेट व्दितीय वर्षास प्रवेश देण्यात येवु नयेत, अशी काही विद्यापीठांची मागणी आहे. याबाबत काही विद्यापीठांनी लेखी कळविलेले आहे. तर काही विद्यापीठांनी अद्याप याबाबत निर्णय झालेला नाही असे कळविले आहे. याप्रकरणी विद्यापीठ स्तरावर लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा असे सर्व विद्यापीठांना आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे शासनाच्या वतीने संचालनालयाकडुन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस यासंदर्भात एमसीए अभ्यासक्रमास लॅटरल एन्ट्री अथवा थेट व्दितीय वर्ष ॲप्रुवल न देण्याविषयी व त्याबाबतची विद्यापीठाची भुमिका कळविण्यात यावी, असे ठरविण्यात आले.

* डॉ. एस.पी. यावलकर, उपसंचालक यांनी सर्व समिती सदस्यांचे आभार मानले व बैठक संपल्याचे घोषित केले.

| | | |
|---|---|---|
| ( डॉ. सुभाष महाजन) | (श्री. दयानंद मेश्राम) | (डॉ. एस.पी. यावलकर) |
| संचालक, | सहसंचालक | उपसंचालक |
| तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई | तंत्रशिक्षण म.रा. मुंबई | तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई |

| | |
|---|---|
| ( डॉ. आर.व्ही. शेटकर) | ( सौ. सुरेखा गोसावी) |
| सहा.संचालक (तां) | सहा.संचालक (अतां) |
| तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई | तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई |